<u>महाराष्ट्र शासन</u>

क्रमांक : गौखनि ४९/३०१९/प्र.क्र.४६/ख-२
महसूल व वन विभाग
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ३२
दिनांक : ३१ ऑगस्ट, २०१९

<u>विषय : गौण खनिज-नागपूर</u>
सन २०१५-१६ या वर्षाकरिता मौजे चिकना, ता. कामठी जि. नागपूर या वाळूगटाची जप्त केलेली अनामत रक्कम परत करणेबाबत.
- मे. ब्रिजेश एन्टरप्रायजेस.

<u>शासन ज्ञापन:</u>

जिल्हाधिकारी, नागपूर यांना त्यांचे पत्र क्रमांक क्र.खनि-३/कक्ष-२१/कावि- /२०१८, दि.२४/१०/२०१८, क्र. खनि-३/कक्ष-२१/कावि-३०६/२०१९, दि.२४/०६/२०१९ रोजीच्या उपरोक्त विषयाबाबतच्या पत्रांस अनुलक्षून असे कळविण्याचे मला निदेश आहेत की, सन २०१४-१५ करीता मौजा चिकना, ता. कामठी हा वाळूगट मे. व्ही. चालसानी यांना सर्वोच्च बोलीद्वारे मंजूर केला. परंतु त्यांनी रेतीघाटाची संपुर्ण रक्कम शासनजमा न केल्याने सदर रेतीघाट रद्द केला. त्यामुळे लिलावधारकाने मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिका क्र.७५२/२०१६ मध्ये मा.न्यायालयाने दि.३/०२/२०१६ रोजी मौजा चिकना रेतीगटाचा फेरलिलाव करावा परंतु न्यायालयाच्या आदेशाशिवाय रेतीगटाचा ताबा देऊ नये असे आदेश पारीत केले. सदर आदेशाच्या अनुषंगाने सन २०१५-१६ करीता उक्त वाळूगटाची ई लिलाव प्रक्रिया राबवून मे. ब्रिजेश एन्टरप्रायजेस यांना सर्वोच्च बोलीने मंजूर केला. परंतु न्यायालयीन आदेशानुसार त्यांना ताबा देण्यात आलेला नाही.

मे. ब्रिजेश एन्टरप्रायजेस यांना दि.१/०४/२०१६ रोजी पत्रान्वये उर्वरीत रक्कम भरणा करण्यास कळविले असता त्यांनी लिलाव कालावधीतील कमी झालेले २ महिन्यांचा कालावधी वाढवून देण्याची विनंती केली. जिल्हाधिकारी नागपूर यांच्या दि.१९/१०/२०१६ रोजीच्या आदेशानुसार लिलावधारकाची सदर विनंती अमान्य करून अनामत रक्कम रू.५,२४,०००/- जप्त करण्यात आली. सदर आदेशाविरूध्द लिलावधारकाने मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्र.११७४/२०१७ दाखल केली. त्यामध्ये मा. उच्च न्यायालयाने दि.६/०२/२०१८ रोजी लिलावधारकाने शासनजमा केलेली अनामत रक्कम सहा आठवड्यात परत करण्याचे आदेश पारीत केले. मा. उच्च न्यायालयाच्या उक्त आदेशाच्या अनुषंगाने लिलावधारकास रक्कम रू.५,२४,०००/- परत करण्याबाबतचा शासनाने निर्णय घेतला आहे.

२. सबब, मे. ब्रिजेश एन्टरप्रायजेस यांना एकूण रक्कम रु. ५,२४,०००/- (रुपये पाच लाख चोवीस हजार फक्त) इतकी शासनजमा केलेली अनामत रक्कम मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अदा करण्यास या शासन ज्ञापनाद्वारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

३. याबाबीवर होणारा खर्च सन २०१९-२० यावर्षाकरीता लेखाशिर्ष "०८५३ - अलोहयुक्त खाणी व धातुशास्त्रीय उद्योग "१०२ - खनिजबाबत सवलत फी व स्वामित्वधन, ९००, अलोहयुक्त खाणकाम व धातुशास्त्रीय उद्योग - वजा परतावे (००) (०१) वजा परतावे (०८५३ ००८६) खाली वजा परतावे देण्याकरीता करण्यात आलेल्या उपलब्ध अंदापत्रकीय तरतूदीमधून खर्ची टाकून भागविण्यात यावा.

४. सदर शासन ज्ञापन वित्त विभागाच्या दि.८/०८/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय शक्तीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०८३११७०९५८९५१९ असा आहे. हे शासन ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

GAJANAN DHARMA DABHILKAR

Digitally signed by GAJANAN DHARMA DABHILKAR
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=c4f6398a3105d0cebbc1a00f25241de3304637656082108e1227c13033d76bfe, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=69c2bd0a657d8ab9b87341301d9ac56408774af7b6416010e1d362583c71ffd6, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=GAJANAN DHARMA DABHILKAR
Date: 2019.08.31 17:16:59 +05'30'

(ग. ध. दाभिळकर)
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति,

जिल्हाधिकारी नागपूर, नागपूर.

प्रत:

१) विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर.
२) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, नागपूर.
३) प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, नागपूर.
४) जिल्हा कोषागार नागपूर, नागपूर.
५) वित्त विभाग, (व्यय-९,अर्थसंकल्प -३, ६ व १४ कार्यासने) हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई -३२.
६) कार्यासन अधिकारी (ब-१ कार्यासन) महसूल व वन विभाग, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई -३२.
७) निवडनस्ती ख कार्यासन, महसूल व वन विभाग, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई -३२.